भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/११/२०१६

**१) संगनमत करुन बिना परवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने व शासकीय कामात अडथळा निर्माण करुन जिवे मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १८/११/२०१६ रोजी ०९.०० वा दर. यातील फिर्यादी सुरेश श्रीराम नेताम वय ३५ वर्ष, रा. भंडारा हा जिल्हा खनिकर्म अधिका—याने अवैधरेती उत्तखन्न व अवैद्यरेती वाहतुक करणारे आरोपी क्र. १ ते ३ यांना रेती वाहनाचा परवाना विचारले असता आरोपी क्र. ४ ते ६ हे घटनास्थळी मोटार सायकल ने येवुन संगनमत करुन फिर्यादीच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करुन बलप्रयोग करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने व ३ ब्रास रेती कि. ६,०००/—रु. ची चोरी करुन ट्रॅक्टर मधील रेती खाली टाकुन पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९,३५३,१८६,५०६,३४ भादंवि. सहकलम ४८ म. ज. मो. अधी १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) स्विप्ट डिझायर गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकलला धडक दिल्याने दोन जखमी . :—**

दिनांक १८/११/२०१६ रोजी १४.०० वा. यातील फिर्यादी अजयकुमार तेजराम लाखडे वय ४१ वर्ष, रा. सौंदड जि. गोदिंया हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३१ डीपी ७५९६ ने साकोली कडुन सौंदड कडे मित्रा सोबत एनएच ०६ रोडने जात असतांना नागपुर कडुन सौंदड कडे जाणा—या आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला मागेहुन धडक देवुन जखमी केले असे फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) धार्मीक भावना दुखावल्याने गुन्हा नोंद. ;—**

दिनांक १७/११/२०१६ रोजी २२.३० वा. दर. यातील दोनही आरोपीतांनी संगनमत करुन कब्रस्थानात प्रवेश करुन दफन केलेले वित्त देहाच्या कब्रावर मोल्यवान वस्तु, गुप्त धन शोधण्याचे इरादयाने तसेच अघोरी कृत्य करण्याचे उद्येशाने खोदकाम करुन भावना दुखावल्याने फिर्यादी अब्दुल नईम अब्दुल वाहाब वय ३५ वर्ष, रा. भाई तलाव वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९५(अ),२९७,३४ भांदवि. सहकलम ३(२)२(१)ख,(४) महाराष्ट्र जादुटोना प्रतीबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक १८/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, साकोली, लाखनी, पालांदुर व कारधा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६५ लिटर हातभट्टी दारु कि. ३,७५०/—रू. व ११ लिटर ३४० मिली लिटर कि. ३,०८४/—रु. तसेच जुगारातुन कि. ७६० असा एकुण कि. ७,५९४/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.